# क्रेन वापरण्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे/सुचना/अटी खालीलप्रमाणे आहे.

०१.क्रेन वाहन एक चालक चालविल काही अपरिहार्य केसेसमध्ये दोन चालकासह परवानगी देण्यात येईल.तसेच क्रेन चालकाकडे क्रेन वाहन चालविण्यासाठी ड्रायव्हिंग लायसन्स असले पाहिजे. व बदली चालकाला सुद्धा हा नियम लागू राहील.

०२. क्रेन वाहनांचे संपूर्ण कागदपत्र (उदा. रजिस्ट्रेशन,पीयूसी,इन्श्युरन्स,फिटनेस,इ.) वेळोवेळी परीपूर्ण केलेले असावेत.

०३.क्रेन वाहनावरील कर्तव्यावहरर असलेले कर्मचारी हे निटनेटक्या व निळ्या रंगाच्या स्वच्छ गणवेशात हजर राहतील व त्यांची वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण असावी.

०४.क्रेन वाहन चालकास कमीतकमी तीन वर्षे गाडी चालविण्याचा अनुभव असावा.अशा चालकाकडे एल एम व्ही/व्यावसायिक/मालवाहतूक (ट्रान्सपोर्ट)/आरटीओ मान्यताप्राप्त वाहनचालक परवाना असणे आवश्यक आहे.

०५.क्रेन वाहन मालकाने सदर वाहनांच्या अनुषंगाने सर्व प्रकारचे कर भरलेले असावेत शिवाय पॅन कार्ड छायांकित प्रत व आयकर भरलेबाबत विवरणपत्र संबंधित वाहतूक शखेला सादर करावेत.

०६.टोईंग पावती पुस्तक वाहतुक शाखेकडून प्रमाणित करून घेण्यात यावे

०७.क्रेन वाहनांचे दिवे सुस्थितीत असावेत.

०८.क्रेनवर कोणत्याही संस्थेचे अथवा बँकेचे कर्ज असल्यास त्याला वाहतूक शाखा जबाबदार रहाणार नाही.

०९.क्रेन मध्ये कोणताही तांत्रिक बिघाड असता कामा नये.तांत्रिक बाबी योग्य असले पाहिजेत.क्रेनला उठून दिसेल किंवा एखाद्या व्यक्तीला चटकन ओळखता येईल अशा रितीने क्रेनला निशान किंवा झेंडा लावला पाहिजे.

१०.क्रेनमधील बिघाड अथवा क्रेनवरील स्थगीती ही आठ दिवसांपेक्षा जास्त असता कामा नये.

११.संबंधित पोलीस अधिकारी वाहतूक शाखा सांगली हे सांगतील त्या त्या ठिकाणी काम करावे लागेल.

१२.क्रेनचे वाहन हे सुस्थितीत असले पाहिजे.क्रेन सोबत कायमपणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील कागदपत्र अद्यावत असणे आवश्यक आह.

१३.क्रेन वाहन मालकाने वाहनावरील कर्मचाऱ्यांना ओळखपत्र पुरविणे आवश्यक आहे.त्यावर प्रभारी पोलीस निरीक्षक वाहतूक नियंत्रण शाख हे प्रतिस्वाक्षरीने करतील.

१४.क्रेन सकाळी ८.०० ते रात्री २०.०० वा.पर्यंत वाहतूक नियंत्रण शाखेकडे काम करेल.तसेच महत्त्वाचे प्रसंगी बोलविले असता हजर रहावे लागेल.

१५.उचलण्यात येणा-या वाहनासाठी क्रेन चालकांना द्यावयाच्या रक्कमेबाबत शासन निर्णयाप्रमाणे विहीत करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाईल.तसेच विहित दरापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाली तरी शासन नियमानुसार दर मंजूर करण्यात येईल

f:\cb-5, sangli\crane\crane 2017-2018 four wheeler.docx

१६.क्रेन चालक हा क्रेन वापरातील तज्ञ असावा.आवश्यकतेप्रमाणे सज्ञान कामगार नेमून त्यांचा पगार क्रेन मालकांनी देण्याचा आहे.या कार्यालयाकडून पगार देण्यात येणार नाहे तसेच कामगारांची पोलीस चारित्र्य पडताळणी झालेली असावी.

१७.क्रेन वाहनांची पुर्ण देखभाल क्रेन मालकांनी पाहणेची आहे.त्याबाबत कार्यालयाकडून कोणतेही आर्थिक तरतूद करण्यात येणार नाही.सदर क्रेन वाहनांस डिजीटल कॅमेरा व पब्लिक अनाऊंस माईकची सोय असावी.

१८.आपणांकडून क्रेन वाहन संबंधित कार्यालयास उशिरा उपलब्ध झाल्यास अथवा नमूद केलेल्या अटीपैकी कोणतीही अटीचा भंग आपल्याकडून झाल्यास आपणास निर्गमित करण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येतील.

१९.क्रेन वाहन अचानक नादूरूस्त झालेस पर्यायी वाहनांची तात्काळ सोय क्रेन मालकास करावी लागेल .क्रेनने वाहन उचलताना वाहनांचे नुकसान झालेस नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी क्रेन मालकाची राहिल.

२०.अति महत्वाचे बंदोबस्ताचे वेळी गाड्या काढण्यासाठी,क्रेनला काम नसेल त्यावेळी सदरचे बंदोबस्तासाठी क्रेनचा वापर केला जाईल व त्या कामाचे भाडे दिले जाणार नाही.

२१.क्रेन पुरवठा करार एक वर्ष कालावधीसाठी बंधनकारक असेल परंतू करारामधील अटी व शर्ती चे उल्लंघन केलेस व क्रेन संदर्भातील कामकाजाची कामगिरी समाधानकारक नसल्यास आपणांस एक महिन्याची नोटीस देऊन क्रेन पुरवठा करारपत्र रद्द करून सुरक्षा ठेव रक्कम रुपये २५०००/-जप्त करण्यात येईल याची क्रेन मालकांनी कृपया नोंद घ्यावी.

२२.दरपत्रक मंजूर झाल्यानंतर क्रेन मालक हे वाहतूक शाखेला करातील अटी मान्य असलेबाबत१००/- रु.स्टँप पेपरवर करार करून देतील.

२३.जाहिरात प्राप्त झालेनंतर आठ दिवसापर्यंत प्राप्त झालेले दरपत्रक शक्य असल्यास पोलीस अधीक्षक सांगली यांचे कक्षामध्ये उघडणेत येतील,क्रेन मालक अनुपस्थित राहिल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

२४.कोणतीही दरपत्रक स्वीकारणे अगर नाकारणे याचे सर्व हक्क तसेच वेळोवेळी बदल व सुधारणा करण्याचे हक्क तसेच सदरची प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक,सांगली यांचेकडून राखून ठेवणेत आलेले आहेत.

२५.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यास इच्छूक क्रेन मालकांनी दरपत्रक सादर करावेत.प्रामुख्याने सदर दरपत्रकामध्ये दुचाकी वाहने टोईंग करणेबाबतचे दर नमुद करताना कोणत्याही प्रकारची खाडाखोड व व्हाईटनर लावलेला असल्यास सदर दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
सदरचा क्रेन पुरवठा हा . २०२४ ते २०२५ या कालावधीसाठी बंधनकारक असेल.

**पोलीस अधीक्षक**
**यांच्या आदेशान्वये,**

**(अरविंद बोडके)**
**पोलीस उपअधीक्षक (मुख्या.)**
**पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली.**